# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
## 3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.

दूरध्वनी - 22620601, 22690602, 22641150/51, फॅक्स - 22692102.
E-mail : desk10@dtemaharashtra.gov.in Internet : www.dtemaharasthra.gov.in


**प्रवेशासंबंधी महत्वाची सूचना**

क्रमांक : 10/एडीएम/पदविका/प्रमाणपत्रे/2017/ 3301

दिनांक : - 6 MAY 2017

**विषय:- शैक्षणिक वर्ष 2017-18 मधील प्रथम वर्ष पोस्ट एस.एस.सी., पोस्ट एच.एस.सी. व थेट व्दितीय वर्ष व्यावसायिक पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी आवश्यक असलेली प्रमाणपत्रे प्राप्त करुन घेण्याबाबत...**

तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील प्रथम वर्ष पोस्ट एस.एस.सी., पोस्ट एच.एस.सी. व थेट व्दितीय वर्ष व्यावसायिक पदविका अभियांत्रिकी या अभ्यासक्रमामध्ये केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमधुन प्रवेश करण्यात येतात. त्यासाठी आवश्यक असणारी प्रमाणपत्रे/ कागदपत्रांची यादी संचालनालयाचे क्रमांक 2अ/एडीएम/प्रमाणपत्रे /2016/1609 दि. 8.12.2016 च्या अधिसुचनेव्दारे प्रसिध्द केलेली आहे.

आता, प्रथम वर्ष पोस्ट एस.एस.सी., पोस्ट एच.एस.सी. व थेट व्दितीय वर्ष व्यावसायिक पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमाचे केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेला सुरुवात होणार असल्याने त्यासाठी कागदपत्रे पडताळणीवेळी प्रवेश नियमावलीत नमुद केलेल्या आवश्यक त्या प्रकरणी लागु पडणारी खालील प्रमाणपत्रे सक्षम प्राधिकाऱ्याकडुन प्राप्त करुन घेऊन ती तयार ठेवण्याबाबत प्रवेशोच्छुक उमेदवारांना याव्दारे पुनश्च सूचित करण्यात येत आहे.

1) जात/जमात प्रमाणपत्र (सक्षम प्राधिकारी यांनी विहीत प्रपत्रात निर्गमित केलेले)
2) पदविका अभ्यासक्रमासाठी जात/ जमात वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य नाही. मात्र अन्य आर्थिक सवलतीसाठी संबंधित विभागाच्या धोरणानुसार सदर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असल्यास व उमेदवार संबंधित विभागाचे "जात/जमात वैधता प्रमाणपत्र" सादर करण्यास अपयशी ठरल्यास संबंधित उमेदवारास खुल्या प्रवर्गातील उमेदवारप्रमाणे शिक्षण शुल्क व इतर शुल्क भरावी लागेल. तसेच या अनुषंगाने काही प्रकरण उद्भवलास परिणामस्वरुप प्रवेश रद्द होण्याची कार्यवाही झाल्यास त्यांची संपूर्ण जबाबदारी संबंधित उमेदवाराची असेल.
3) नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र (अनूसूचित जाती/अनुसूचित जमाती व्यतिरिक्त उर्वरीत सर्व मागासवर्गीय उमेदवारासाठी)
4) अधिवास प्रमाणपत्र (प्रवेश नियमावलीत नमुद केलेल्या प्रकरणी आवश्यकतेनुसार)
5) उत्पन्नाचे प्रमाणपत्र (TFWS योजनेअंतर्गत प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांनी सक्षम प्राधिकारी यांनी विहित प्रपत्रात निर्गमित केलेले)
6) अपंगत्वाचे प्रमाणपत्र (आवश्यकतेनुसार सक्षम प्राधिकरी यांनी विहीत प्रपत्रात निर्गमित केलेले)
7) Defence/अल्पसंख्याक इ. संवर्गातून प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांच्या प्रवेशासाठी विहीत नमुन्यातील प्रमाणपत्रे
8) Foreign Students/ NRI, Persons of Indian Origin, Workers in Gulf Countires / Non Resident Indian इ. संवर्गातुन प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या इमेदवारांच्या प्रवेशासाठी संबंधित सक्षम प्राधिकरणाचे समकक्षता प्रमाणपत्र (प्रवेश नियमावलीत नमुद केलेल्या प्रकरणी आवश्यकतेनुसार)
9) एसएससी, एचएससी, किंवा त्यांच्याशी समतुल्य परीक्षेत अक्षरातील श्रेणी दिलेल्या असतील तर, उमेदवाराने, आवेदनपत्र सादर करण्याच्या वेळी संबंधित सक्षम प्राधिकाऱ्याकडून/मंडळाकडून अक्षरातील श्रेणींचे समतुल्य

गुणांमध्ये रुपांतर करुन घेतल्याचे प्रमाणपत्र (प्रवेश नियमावलीत नमुद केलेल्या प्रकरणी आवश्यकतेनुसार). समतुल्य गुणांच्या आधारे पात्रता ठरविण्यात येईल.

10) सी.बी.एस.ई (C.B.S.E.), आय.सी.एस.ई. (I.C.S.E.), एन.आय.ओ.एस. (N.I.O.S.), आय.जी.सी.एस.ई. (I.G.C.S.E.), व इतर मंडळाकडुन दहावीची परिक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांनी तंत्रनिकेतनामध्ये प्रवेश घेण्यासाठी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांचेकडुन किंवा त्यांच्या अधिपत्याखालील विभागीय मंडळाकडुन समकक्षता प्रमाणपत्र (प्रवेश नियमावलीत नमुद केलेल्या प्रकरणी आवश्यकतेनुसार)

11) आधार क्रमांक व संलंग्नित बॅंक खाते: शिष्यवृत्ती, शुल्क प्रतिपुर्ती इ. योजनांची रक्कम थेट लाभार्थीच्या खात्यात जमा होण्यासाठी आवश्यक

**इशारा: मागील शैक्षणिक वर्षात काही उमेदवारांनी व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेदरम्यान काही प्रमाणपत्रे जसे जात/जमात प्रमाणपत्रे/अपंगत्वाचे प्रमाणपत्र/नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्रे ही सक्षम प्राधिकाऱ्याकडुन प्राप्त करुन न घेता बनावट प्रकारची सादर केल्याचे पडताळणीअंती आढळून आले होते अशा उमेदवारांचा प्रवेश रद्द करुन त्यांचेविरुध्द फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. आता प्रवेशोच्छुक उमेदवारांना पुनश्च सूचित करण्यात येते की, त्यांनी सक्षम प्राधिकाऱ्याकडुन प्रमाणपत्रे प्राप्त करुन न घेता बनावट अथवा खोटी प्रमाणपत्रे प्रवेशासाठी सादर केल्याचे आढळल्यास अशा उमेदवाराचे प्रवेश रद्द करुन त्यांचे विरुध्द फौजदारी गुन्हे दाखल करण्यात येतील याची संबंधितांनी नोंद घ्यावी.**

प्रवेशाबाबतची माहिती या संचालनालयाच्या www.dtemaharashtra.gov.in संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल.

अधिक माहितीसाठी संचालनालयाच्या विभागीय कार्यालयांकडेही संपर्क साधता येईल.

| | |
|---|---|
| मुंबई - 022-26474892, 26471619 | औरंगाबाद - 0240- 2334216, 2334769 |
| पुणे - 020- 2565 6234, 25678973 | अमरावती - 0721- 2573027 |
| नाशिक - 0253- 2461479, 2460114 | नागपुर - 0712 - 2565143, 6465141 |

(डॉ. सुभाष महाजन)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.,मुंबई.

**प्रत:- माहिती व उचित कार्यवाहीसाठी रवाना.**

1. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती/औरंगाबाद/मुंबई/नागपुर/नाशिक/पुणे.
2. प्रणाली विश्लेषक, कार्यासन क्र. 3, मुख्य कार्यालय, मुंबई
3. निवडनस्ती.